दिनांक: १९ ऑक्टोबर २०२१

मासिकांक ८

# “ती” चं पान

## तिच्याकडून सगळ्यांसाठी



संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

# अनुक्रमणिका


| पान | लेख | लेखक |
|---|---|---|
| ३ | प्रस्तावना | सायली देशपांडे |
| ४ | दोन शब्द | मंदार मोरोणे |
| ५ | चांदण्यातल्या गुज गोष्टी | संजीवनी मराठे |
| ७ | मी चंद्र तू चांदणी | निर्मिती देवलसी |
| ९ | चंद्र नभीचा चंद्र मनीचा | रेणुका देशपांडे कुकडे |
| १२ | चंद्र आहे साक्षीला | स्वर्णिमा प्रकाश |
| १५ | भेट अपुली स्मरशी | मृण्मयी सारंग |
| १७ | चांदोबा काल आणि आज | प्राजक्ता बर्वे |
| १८ | चंद्र आहे साक्षीला | भार्गवी बाबरेकर |
| २१ | दोन तारे | दिशा टिकेकर |
| २३ | मातृरूपेण संस्थिता | अपूर्वा भालेराव |
| २५ | तोच माझा सांगाती | तृष्णा खर्डेनवीस |
| २७ | चंद्रावलोकन | सायली देशपांडे |
| २९ | या नभीच्या चांदण्यांनो | कल्याणी देशपांडे |
| ३१ | समारोप | सायली देशपांडे |


**कोजागिरी विशेषांक**

टीप: पान क्रमांकावर क्लिक/टॅप करून आपण आपल्याला हव्या असलेल्या लेखावर जाऊ शकता

(Works best with Adobe Acrobat Reader)

# प्रस्तावना

"चंद्रमा मनसो जात:" या उक्तीप्रमाणे मानवी मनात असणाऱ्या वेगवेगळ्या भावनांचा कारक म्हणजे चंद्र असंच म्हणता येईल.  शारदीय नवरात्र संपन्न झालं की वेध लागतात ते शरद पौर्णिमेचे अर्थात आपल्या आवडत्या कोजागिरी पौर्णिमेचे. को जागर्ति असा प्रश्न विचारत असलेला हा दिवस तुमचं मन किती जागृत आहे हा विचार करायला सुद्धा भाग पाडतो.यंदाचा हा आमचा आठवा मासिकांक.आठ हा आकडा सुद्धा किती शुभ! नाही का? भगवान श्रीकृष्ण हा सुद्धा देवकीचा "आठवा" पुत्र. त्याच्या जन्माचा साक्षी सुद्धा हा चंद्रच..! ती चं पान सुद्धा त्या चंद्रकलेप्रमाणे दिवसेंदिवस पूर्णत्वाकडे वाटचाल करतोय. याचा मनस्वी आनंद आहे.

चंद्र हा मनाचा कारक असल्याने मानवी मनात येणारे विचार आणि असलेल्या भावना यांना एक हळवा कोपरा आपोआपच बहाल केलेला दिसतो. मनात असलेल्या विचारांना कागदावर उतरवून त्याचा आनंद अपल्यासारख्या वाचक रसिकांना द्यावा याच एकमात्र भावनेने यंदाचा हा मासिकांक "चंद्र" या शब्दाभोवती गुंफलेला आहे. साहित्यक्षेत्राशी संबंधित असलेला प्रत्येक व्यक्ती चंद्र या विषयाशी अनभिज्ञ असेल हे शक्य नाही. कोजागिरी पौर्णिमा ही सुद्धा मनाला आल्हाद देणारी अशीच असते. या मासिकांकात दोन शब्द लिहून देणाऱ्या श्री. मंदार मोरोणे यांचे सुद्धा मनःपूर्वक आभार..!

तेव्हा तिच्या या चंद्रप्रवासात तुम्ही सहभागी व्हा आणि शब्द चांदण्यात न्हाऊन निघाल अशी आशा व्यक्त करते आणि माझ्या लेखणीला विराम देते..!

**- सायली अक्षय देशपांडे**

# दोन शब्द

लहानपणी आपले शिकणे सुरु होते ते निरीक्षण आणि श्रवण यांच्या माध्यमातून. पुढे जाऊन याला जोड मिळते वाचनाची आणि मग लेखनाची. आपण सगळ्यांनी लहानपणी केलेला हा प्रवास हाच चांगले लेखन करण्याचा राजमार्ग आहे. लेखन करावयाचे असेल आणि ते उत्तरोत्तर चांगले करत न्यावयाचे असेल तर निरीक्षण, श्रवण आणि वाचन याला पर्याय नाही. या गोष्टी जितक्या जास्त तितका लेखनाचा कस वाढत जातो. किंबहुना, अभिव्यक्त होण्याअगोदरची ही पूर्वतयारीच आहे. ती चांगली करणे याला पर्याय नाही.

याशिवाय, प्रत्यक्ष अनुभवाचे आणि लेखनाचेही अतूट मैत्र आहे. अनुभव जितका कसदार तितके चांगले लेखन. आणि चांगले अनुभव घ्यायचे असतील तर त्याला प्रवासाची जोड देणे अपरिहार्य आहे. प्रवास तुम्हाला जग, परिस्थिती, इतिहास, भूगोल, संस्कृती आणि सगळ्यांत महत्वाचे म्हणजे माणसे वाचायला, समजायला शिकवतो. हे असे समजणं आणि स्वत:त ते रुजवून घेणे सुरू झाले की लेखन आपसूकच सुधारणार हे ओघाने आले.

आणि ओघ हा तर लेखनाचा प्राणच. लहान मुलाला एखादी गोष्ट उलगडून सांगावी, एका धागा झाला की दुसऱ्याचे टोक पकडावे असे ओघवते लेखन घडत गेले तर वाचकाला आणि महत्वाचे म्हणजे लेखकालाही मजा येते. हे असे आजीच्या गोष्टीसारखे लिहिणे हे एक सुखावणारे आव्हान आहे.

कलेचा उद्देश सर्जन, बुद्धीला चालना आणि आनंद देणे असेल तर लेखनकला ही या सगळ्या गोष्टींची पूर्तता करते. एखाद्या शब्दासाठी, कल्पनेसाठी बराच काळ अडून राहावे आणि नकळत कुठून तरी ते गवसले की जो काही आनंद मिळतो, त्याला अवर्णनीयशिवाय दुसरा शब्द नाही. “ती’चं पान’ साठी लिहिणाऱ्या सर्व लेखिकांना हा लेखनाचा पुरेपूर आनंद मिळो आणि उत्तमोत्तम लिखाण होत राहो, याकरिता मन:पूर्वक शुभेच्छा . ‘ती’ची डिजिटल वाटचाल यशस्वी होईल, हा विश्वास आहेच.


**मंदार मोरोणे,**
**महाराष्ट्र टाइम्स,**
**नागपूर**
७७७७०९७९८६

# चांदण्यातल्या गुज गोष्टी

उपमा सुद्धा पहा ना, कशा रीतीने दिल्या जातात -
चंद्र म्हणजे शीतलता, तर चांदणं म्हणजे सडा प्रेमाचा,
चंद्र म्हणजे वेड्या रात्रीचा सोबती, चंद्र म्हणजे विरहातला सारथी,
चंद्र म्हणजे डागाळलेला, चंद्र म्हणजे शापित ,
चंद्र म्हणजे चांदोमामा, चंद्रानेच कोजागिरी ,
लिंबोणीच्या झाडामागे कधी लपलेला ,कधी  कला- कलांनी आपली झोप उडवलेला ,
ज्याच्याशी बोलताना समुद्रालाही येते भरती, त्या चंद्राशी तू केल्यात कधी गुजगोष्टी ?

अर्थातच प्रश्न करत्याकडे उत्तर आहेच... हो ..मी केल्यात.. खूपदा केल्यात ...अनेकदा मी मोकळी झाले ,तर कधी त्याचे ही ऐकले...

अंगणात पडलं जसं चांदणं पीठूर ,
मिळाली मला त्याच्या आगमनाची चाहूल ,
आज तो जरा दबकत बिचकत आला ,
म्हणे तू सांगते रोज आज मी बोलू जरा ?,
त्याच्याही मनात काही राहू शकतं कधी ?
ग्रहतारे यांना मन असतं तरी ?
मनात हे ठेवून उघड म्हटलं बोल की,
क्षयाच्या येत्या फेरी आधी मन हलकं कर की,
खाली करून डोळे गालात तो हसला,
मनकवडी ही माझ्या तक्रारी जाणल्या ,
सध्या काय नुसते प्रश्नच मला पडतात ,
काळोख्या रात्रीत जागीच धडपडतात ,
पारदर्शी असावं तर म्हणे सूर्यासारखं,
पवित्रता चारित्र्याची झळकते सहस्त्र किरणातनं,
मूर्तिमंत सामर्थ्याचे ते रूप आहे ,
कर्तव्य पथावर त्याचा म्हणे क्रमांक अग्र आहे,
मी असा अंधारातील एक मात्र निशाचर ,
विविध कलां तूनही होते मला निद्रेचेच दर्शन ,
त्या शोकाकुल मनातून एक तारा निखळला ,
भूतलावर प्रेमाच्या संवेदना जागवल्या ,

मी म्हंटले खुळा तू उत्तर दिलेस तूच ,
कर्तव्याच्या वरची पायरी आहेस तूच ,
प्रत्यक्ष प्रेमाचं रूप तू किती समर्पित केलंस ,
सुखमय निद्रेसाठी तू भास्कराचं तेज प्यायलं ,
बंद कुपितील सर्वांची रहस्ये तुलाच ठाऊक ,
चावी तुझी चांदण्यांची करतेच अशी भावूक,
सूर्याची नजर सुद्धा  तुझ्यावरच खिळते ,
पश्चिमेकडे मावळूनही एक एक किरण सोडीत असते ,
उगाच का तुझ्याकडे चांदण्या बघतात टकमक ,
आहेच माझा शशी माझ्या आई सारखा सुंदर ,
निरागस प्रेमाचा तू असा पल्ला गाठला ,
आम्ही डोळे मिटल्यावर आमच्या काळजीत राहिलास
आमच्या पृथ्वी मातेचा तू विश्वास संपादलास
गड्या
कोण जवळ आहे ते अंतर मोजून पहा....
सूर्याला अर्घ्य देऊन दिवसाची सुरुवात करतो
सामर्थ्याची उपासना आम्ही रोज करतो
पण म्हणून तुझं महत्त्व कमी नाही होत रे
भाऊबीजेला आम्हाला भाऊ तूच,
-जुनी दशी घे - नवीन दशी दे. हे हक्कानी मागण्याचं आमचं स्थान तूच
स्वतः श्रीकृष्णाने देखील रास लीलेसाठी पौर्णिमेचं चांदणंच निवडलं
पवित्र तुझ्या चांदण्या रात्रीची
विश्वामित्रांच्या तपश्चर्येशी तुलना केली आहे
प्रतिपच्चंद्रलेखेव ह्या विश्वासावर ,स्वराज्य येथे अंकित आहे.
पौर्णिमा अमावस्या तुझ्या आमच्यासाठी खास आहे.
कविराजांच्या शैली इथल्या ,तुझ्या कलांवर तर टिकून आहे.
पाहता पाहता पहाटेची किरणं दिसू लागली.
तसं त्याने पटकन आपली गोष्ट आवरती घेतली ...
आणि हसून म्हणाला.. रुक्मिणी आली वाटतं ,आता राधेला निघायला हवं आणि मला निरोप दिला..

**- संजीवनी मराठे**

# मी चंद्र तू चांदणी

एके दिवशी मी आणि सखी निघालो निसर्गाच्या सुंदर अशा चंद्र आणि चांदण्या रात्रीच्या सफरीसाठी . झालं असं की , आम्हा दोघांनाही कडाडून भूक लागली . थांबा .... थांबा ..... अहो , तुम्हाला काय वाटल ..... अहो ही भूक होती ती विरहाची , प्रेमाच्या त्या दोन शब्दांची , दोन गोष्टींची.

मग मी म्हणालो सखीला - या सुंदर अश्या पौर्णिमेच्या रात्री तू आणि मी मस्तपैकी चंद्राची भाकरीनी चांदण्यांचा ठेचा करून खाऊ .....

दे हात हाती सखी
तुझा चांदण्यांचा ।
डोईवरचा पदर ढळला
लाजला चंद्र पुनवेचा ।।

नभीच्या चंद्राची
पाहुनी शुभ्र चंद्रकोर ।
चांदण्या होऊनी वेड्या
नाचताहेत जणू मोर ।।

पौर्णिमेची रात्र जन्माला येते
आणि होतो हळूच तरुण ।
आणि माझ्या मनातला कालवा
फिरतो वावटळ होऊन ।।

त्याचे रंग नि माझ्या भावना

बदलतच जातात ।

पौर्णिमेच्या दिवशी माझे डोळे

त्याचीच वाटत पाहतात ॥

रात्रभर उषा वरी

असतो तोच एक सोबतीला ।

पण हा  भामटा

पाहतच बसतो मला ॥

आजकाल चंद्राशिवाय

सरत नाही माझी रात्र ।

मग मीही खिडकीतून

हळूच लिहितो तुझ्या रुपी त्याला पत्र॥

**- निर्मिती रा. देवलसी**

# चंद्र नभीचा चंद्र मनीचा

"symptoms mild आहेत आणि tests वरून आपल्याला अधिक माहिती मिळू शकेल. 50 पैकी एका बाळाला हा disorder असतो, त्याची तीव्रता प्रत्येकाची वेगवेगळी असू शकते. physical, speech, occupational अश्या काही therapies लवकरात लवकर सुरू कराव्या लागतील. बँगलोरच्या specialists ची appointment मिळू शकली तर ते नक्कीच फायद्याचं ठरेल..." डॉक्टर बोलत होते त्यातला एकही शब्द तिच्या मेंदू पर्यंत पोहोचत नव्हता. तिची मती पहिल्या शब्दापाशीच कुंठली. Autism!

"Autism?" आपल्या बाळाला? छे छे, काहीतरीच काय! हे असलं दूरच्या ओळखीतल्या कोणालातरी असतं, मग त्या बद्दल लोकांना वाटणारी हळहळ अधून मधून कानावर पडत असते. कधी तरी अश्या मुलांवर सिनेमे तयार होतात. ते बघून आपल्याला कळवळा येतो, आपणही 4 अश्रू गाळून थिएटर बाहेर पडतो आणि परत आपल्या कामाला लागतो. आपल्या घरात, आपल्या मुलांना होणारे हे प्रकार नव्हेतच! शक्यच नाही, आपल्या बाळाला असलं काहीतरी.. डॉक्टरांची गफलत होतेय नक्की. कदाचित reports कुणासोबत बदलले असतील. आता इतके patients आल्यावर असं होऊच शकत की! पेलत नसताना कशाला घ्यावे इतके patients! हो हो, हे असंच आहे.. reports ची अदलाबदल झालीये नक्कीच!

" नाहीतरी डॉक्टर म्हणतात आहेत की, अशी मुलं आत्ममग्न असतात. पण आपला शशी कुठेय आत्ममग्न! हां जरा शांत स्वभावाचा आहे, फारसं बोलत नाही अजून. पण दोन वर्षांचं मुल असं किती बोलणार. लोक बघून बिचकतो कधी कधी. बरेचदा एकटाच खेळत बसतो, त्याला कोणाची सोबत लागत नाही. "

एक एक बिंदू डॉक्टरांनी सांगितल्या नुसार जुळायला लागल्यावर ती जरा धास्तावली! "बरोबरीच्या मुलांशी खेळण्यात त्याला रस नसतो, बरेचदा सतत स्वतःभोवती गिरक्या घेत असतो. आपण एखाद्या वस्तू कडे बोट दाखवलं तरी ते बघण्यात रस नसतो."

एकेक गोष्ट आठवताना तिचा धीर हळू हळू सुटत चालला. हे रिपोर्ट्स शशीचे नाहीच, या नकाराची भक्कम तटबंदी हळू हळू ढासळत चालली.

"इतक्या हौसेने 9 महिने वाट बघितलेल्या, गेली 2 वर्ष जीवापाड जपलेल्या, वाढवलेल्या मुलाला autism! आपण काळजी घेण्यात कुठे कमी पडलो? की देवाचं करण्यात काही उणीव राहिली? हा प्रकोप कशाचा? यात चूक आपली की निसर्गाची?

ही शिक्षा माझ्याच नशिबी का म्हणून! डोक्यात एकदम सणक गेली! काय म्हणून नाही केलं देवाचं विचारा! सगळी व्रत वैकल्य, उपास तपास, पूजा अर्चा. सासरी, माहेरी सगळी एकाहून एक भक्त मंडळी. कधी कोणता नेम चुकवला नाही. काय फायदा त्या साऱ्याचा! मग कोणत्या कामाचा देव! आणि प्रगती प्रगती म्हणतात ती ही कोणती प्रगती विज्ञानाची! यावर काही औषध नाही म्हणे. therapies घ्यायच्या सतत, पण त्याचा फायदा कितपत होणार कोणालाच ठाऊक नाही! एक कोवळा जीव नाहक यात पोळला जाणार, पण विज्ञान काय करणार तर डोळे मिटून स्वस्थ बसणार! कदाचित माझं बाळ कधीही शाळेत जाऊ शकणार नाही, शिकू शकणार नाही, कदाचित त्याचं कधी करिअर नसेल, बरोबरीची मुलं एकेक टप्पा ओलांडून पुढे निघून जातील आणि हा बसेल नुसता स्वतःभोवती गिरक्या घेत!" क्षणागणिक पारा वर चढत चालला. बोंबा ठोकून, डोकं आपटून, गडाबडा लोळून, काय करून या संतापला वाट मोकळी करून देऊ तिला कळेना. बधीर झालेलं सर्वांग आणि मनात थयथया नाचणारा क्रोधाग्नी. ती सैरभैर झाली.

"काहीतरी उपाय असेलच ना यावर. डॉक्टरांना माहिती नसेल पण आपल्या गुरुजींना विचारता येईल की. 16 सोमवार, 21 गुरुवार काय वाट्टेल ते करेन मी. आयुष्यभर एकभुक्त राहीन पण माझ्या शशीला यातून बरं कर देवा! सगळी दुःखं माझ्या पदरी घाल देवा पण माझ्या बाळाला नको देऊस रे असलं काही व्यंग. काहीतरी मार्ग दाखव रे देवा." मन धावा करू लागलं.

आपल्या जीवनाचा चंद्र म्हणून कौतुकाने शशी नाव ठेवलं, तो खरोखर चंद्रासारखा परावलंबी, दुबळा निघावा, याचं तिला वैषम्य वाटलं...

"काय चुकलं? कुठे चुकलं? कोणाचं चुकलं? मन थाऱ्यावर राहीना. 50 मधून एकाला असतो ना हा disorder. मग नेमका माझा शशीच तो एक का! बाकी 49 पैकी कुणी का नाही !" मनाला हा विचार स्पर्शून गेला आणि ती चपापली. कुणाच्या बाळाच असं कसं वाईट चिंतला आपण, तिला खूप अपराधी वाटू लागला. "आपल्या नशिबी असतील हे भोग पण अजून कोणत्याच आईला हे भोगावं लागू नये. लोकांच्या कधी कुजबुजणाऱ्या , कधी चुकचुकत  दया दाखविणाऱ्या नजरांना कुणालाही सामोरं जावं लागू नये." खूप थकल्यासारखं, अगदी हताश वाटू लागलं. खोल, काळोख्या गर्तेत कुणीतरी ढकलल्या सारखं. किंचाळायचं असताना वाचाच गेल्यासारखं.. तोल सुटू लागला. मन आक्रंदत होतं. श्वास कोंडला गेला. "वाचवा कुणीतरी, सोडवा कुणीतरी."

“मा मा मा मा मा मा” ती एकदम भानावर आली. शशी बावरल्या नजरेनी तिच्याकडे बघत होता. दवाखान्यातील गजबज बघून तो घाबरला होता. आईच्या आधारासाठी आसुसला होता. तिला बिलगण्याची त्याची धडपड तिच्या लक्षात आली. तिने त्याला उचलून कडेवर घेताच त्याने तिला घट्ट मिठी मारली. आईचा आधार त्या कोवळया जीवाला मिळाला पण त्याक्षणी गर्तेतून सावरण्याचं बळ मात्र तिला मिळालं. साऱ्या शंकांची उत्तरं त्या एका मिठीत दडलेली होती.

“तो स्वयंप्रकाशी नसेलही, पण ते बाळ कसंही असलं तरी माझं आहे. मी त्याच्यासाठी बघितलेली स्वप्नं पूर्ण होणार नाहीत, त्याला कधीही नॉर्मल आयुष्य जगता येणार नाही या गोष्टींमुळे त्याचं माझ्यावरचं प्रेम, विश्वास कमी होत नाहीये, तर माझी ममता कशी बरं कमी होईल! आता मलाच त्याचा चंद्र व्हायला हवं. जगाची दाहकता, प्रखरता निववणारा, सगळया दुःखांची उष्णता स्वतः साहून त्याला मायेची शीतलता देणारा चंद्र. मलाच त्याचा चंद्र व्हायला हवं. डागाळलेला असला तरी चालेल पण माझ्या प्रेमाच्या चंद्राची  अमावस्या कधीही होणार नाही.”

मनातलं द्वंद्व आता शमलं होतं . पौर्णिमेचं शांत चांदणं तिच्या डोळ्यांत उतरलं होतं.

**- सौ. रेणुका देशपांडे कुकडे**

# चंद्र आहे साक्षीला

आज सकाळी मनू शेजारच्या आजींकडे फुलं द्यायला गेली तेव्हा नेहेमी हसतमुख असणाऱ्या तिच्या कुंदा आजीला आज शांत शांत बघून तिला जरा आश्चर्य वाटलं. तिने आजींना विचारलं पण की काही होतंय का म्हणून, पण आजी काहीच बोलल्या नाहीत. मनू काही न बोलता फुलांची टोपली ठेवून घरी निघून आली.

" आई, ए आई "

" काय झालं ग? तू कुंदा आजीला फुलं द्यायला गेली होतीस ना! दिलेत की नाही मग?"

" अगं दिले ग. पण आई कुंदा आजीला बरं नाहीया का ग?"

" नाही तर.. म्हणजे काल संध्याकाळीच तर भेटली मी त्यांना, तेव्हा तर असं काही वाटलं नाही मला. का गं असं का विचारते आहेस पण तू?"

" काही नाही ग आत्ता फुलं द्यायला गेली होती ना तेव्हा आजी शांत शांतच होत्या. जरा अस्वस्थ पण वाटत होत्या म्हणून विचारलं बाकी काही नाही."

" बरं ठीक आहे मी बोलते कुंदा आजीशी. थोड्यावेळाने जाऊन येईन मी त्यांच्या घरी. तू नको काळजी करुस. "

असं म्हणून आई आणि मनू दोघीही आपापल्या कामाला लागल्या. घरातील सगळी कामं आटपून मनूची आई कुंदा आजीकडे गेली. आजी त्यांच्या आरामखुर्चीत कसला तरी गहन विचार करत बसल्या होत्या. मनूच्या आईने दोन-तीन वेळा आवाज दिला पण त्या काही बोल्ल्याच नाही. हा सगळा प्रकार मनूच्या आईला जरा खटकलाच. मनूच्या बाबांना सांगून एकदा डॉक्टरांना घेते तिची आई घरी जायला निघू लागली तितक्यात तिला कुंदा आजीचा आवाज आला.

"मीनल ए मीनल काय म्हणतेस ग?"

"काकू तुम्हाला बरं वाटतं नाहीये का?"

"नाही ग, असं काही नाही. आत्ताच कामं आटोपली सगळी म्हणून म्हटलं जरा बसावं दोन मिनिटं."

"बरं बरं तुम्ही करा आराम मी येते मग संध्याकाळी आरामात." "अगं पण काही काम होतं का तुझं?"

“ नाही हो! सकाळी मनू आली होती ना फुलं घेऊन तेव्हा तुम्हाला असं शांत बघून तिच जरा अस्वस्थ झाली. म्हणून बघायला आली होती बाकी काही नाही. तुम्ही करा आराम मी येते मग आरामात. ”

“ हो चालेल.. ”

एवढं बोलून मनूची आई निघून गेली आणि कुंदा आजी पुन्हा त्यांच्या विचारात रमल्या . खरंतर या शांततेचं आणि अस्वस्थतेचं कारण त्यांनाही काळत नव्हतं . फक्त त्या आता एकट्या नसून ही शांतता आणि अस्वस्थता त्यांचा जोडीला आली आहे एवढंच काय ते त्यांना कळलं होतं.

पाच वर्षांपूर्वी साठे आजोबा अचानक हार्ट ॲटॅक नी गेले. तेव्हापासून कुंदा आजी एकटीनेच सगळं सांभाळतात. तशा धीराच्याच आहेत त्या, पण मग असं काय झालं असेल की ज्यामुळे त्या इतक्या अस्वस्थ झाल्यात हा प्रश्न सगळ्यांनाच पडला होता.

मनूची आई रोज संध्याकाळी कुंदा आजींबरोबर गप्पा मारायला जायची. दोघीही एकमेकींजवळ मन मोकळं करायच्या, इकडचं तिकडचं बोलायच्या, गमती जमती सांगायच्या आणि परत आपापल्या कामाला लागायच्या.

नेहमीप्रमाणे मनूची आई आजही गेली. आजीही छान फ्रेश होऊन बसल्या होत्या. मनूची आई दिसताच आजींनी विचारलं,

“कॉफी घेशील ना गं मीनल? दोघींसाठी करते म्हटलं..”

“हो काकू घेईन की. आज कॉफी घेत गप्पा मारू.”

मग काय कॉफीच्या जोडीने गप्पांना सुरुवात झाली !

“काकू एक विचारू का हो तुम्हाला?”

“अगं विचार की. त्यात काय एवढं”

“ तुम्हाला खरंच बरं वाटत नाहीये का? काही होतय का? आपण जायचं का डॉक्टरांकडे? हवं तर सतीशला घेते सोबत.

" अगं नाही गं बाई! काही झालेलं नाहीये मला. वयोमानानुसार थोडं फार चालायचंच. शेवटी काय पिकलेलं पान ते कधीतरी गळयाचंच" "काकू असं भलतंच काहीतरी कशाला बोलता संध्याकाळच्या वेळेला ! वय झालं आता माझं. ८५ वर्ष काही कमी झालीत का! मनुष्याला लाभलेली सगळी सुखं उपभोगून झालीत, आता काय करायचं आहे आणखीन जगून!"

बरं काकू परवा कोजागिरी पौर्णिमा आहे बरं. कसं काय करायचं आहे ते सांगाल मला. "अरे हो की! चालेल. नेहेमीप्रमाणे ठरवू आपण कसं काय करायचं ते. चला येते मी आता. "

"हो हो "

दोन दिवसांनी पौर्णिमा असल्याने चंद्र बऱ्यापैकी मोठा दिसत होता आज. कुंदा आजी त्या चंद्राचं निरीक्षण करत स्वतःशीच बोलू लागल्या...

आपलं पण आयुष्य या चंद्राच्या कलांसारखंच तर असतं. चंद्र जसा अमावस्या ते पौर्णिमा आणि पौर्णिमा ते अमावस्या असा प्रवास करतो आपण पण तर अगदी तसंच शून्यातून सगळं विश्व उभं करून परत शून्यात विलीन होतो!

अमावस्येपासून पौर्णिमेपर्यंत जसा चंद्र कला कलाने वाढत जातो तसंच आपणही कला कलाने मोठं होतो. वयाने, अनुभवाने मोठं होत यशाचं शिखर गाठतो आणि काही काळ तिथे रमतोही!

मग पौर्णिमेपासून अमावस्येपर्यंतचा प्रवासा सुरू. आतापर्यंत पार पडलेल्या सगळ्या जबाबदाऱ्या पुढच्या पिढीला सुपूर्त करत शून्यातून उभं केलेल्या या विश्वातून मग आपणही हळू हळू अलिप्त होऊ लागतो!

काय गंमत आहे नाही! केवढं ते साम्य आपल्यात आणि त्या कोसो दूर असलेल्या चंद्रात ! म्हणूनच कदाचित एवढा जवळचा वाटत असावा तो आपल्याला!

आपल्या सगळ्यांच्या आयुष्याच्या प्रवासाचा आणि कुंदा आजीच्या अस्वस्थतेपासून ते शांततेपर्यंतच्या प्रवासाचा तो चंद्र जणू साक्षीदार! हा विचार करून त्यांच्या चेहऱ्यावर स्मित हास्य पसरलं..आणि त्याच स्मितहास्यासह शांत झोपी गेल्या!

- स्वर्णिमा प्रकाश

# भेट अपुली स्मरशी

आज खूप दिवसांनी स्वतःसाठी असा निवांत वेळ मिळाला. एकटीच बसले होते आणि अचानक खिडकीच्या छोट्याश्या कोपऱ्यातून तू डोकावून पाहिलंस. स्वतःच्याच विचारातून बाहेर पडून कधी तुला न्याहाळायला लागले माझं मलाच कळलं नाही. काळ्याभोर आकाशात इवल्या इवल्या त्या असंख्य चांदण्याच्या मध्ये तू अगदी लख्ख, शुभ्र , नितळ अश्या प्रकाश्यात ऐटीत उभा होतास. जणू अनेक गोपिकांसोबत तो मनमोहन मुरलीधर रास क्रीडा करतोय. माझं अशांत मन कधी तू स्वतःकडे वळवून शांत केलंस हे माझ्यासाठी गुपितच होत.

रोजचं ते जगणं, धावपळ, काहीतरी मिळवण्याची धडपड आणि त्या धडपडीत हातचं सुटून नको जायला यासाठी करत असलेली खटाटोप, मानापमान, स्पर्धा अश्या अनेक गोष्टींमध्ये मी स्वतःला कधी विसरत चालली होते मलाच कळत नव्हतं . सतत इतरांसाठी करता करता , इतरांच मन जपता जपता , इतरांसाठी जगताना हेच स्वतःसाठी सुद्धा करणं जणू मी विसरून गेले होते.

आज स्वतःसाठी वेळ काढून बसली होती, हाच सगळा विचार सुरू होता तेव्हा तू मात्र माझ्याकडे बघून हसत होतास.तुझ्या त्या मोहक हसण्याने माझं लक्ष तुझ्याकडे खेचल्या गेलं. मनात तुला प्रश्न विचारावेत, त्याची उत्तरं तुझ्याकडून घ्यावीत हा विचार आलाच की केव्हा त्या आकाश्यातून उतरून तू प्रत्यक्ष मटकन माझ्या शेजारी येऊन  बसला समजलंच नाही. तुझं निरागस रूप, शांत नितळपण स्वतःचं अस्तित्व जपणारा प्रकाश तुझ्यासोबत आलेला तो गारवा ह्या सगळयानी  माझं मन अगदी  शांत केलं

तुझ्या अस्तित्वामुळे पटलं की उगाच नाही तुला मनाचा कारक म्हणत. अशांत, भांबावलेल्या , संभ्रमित अश्या माझ्या मनाला तू अलगद स्पर्श केलास आणि त्यातील सगके विकार चटकन दूर केलेस. मनाला देखील तुझ्यासारख नितळ , शांत केलंस. माझे किती तरी प्रश्न तू न विचारताच सोडवलेस.

तू फक्त माझ्या शेजारी बसला होतास. मी तुला न्याहाळत होते. कुठलाही शाब्दिक, अलंकारिक असा संवाद आपल्यात सुरू नव्हता . पण तरीही आपण मनसोक्त गप्पा मारत होतो. तू मला खूप काही शिकवत होतास आणि ते मी एखाद्या गुणी विद्यार्थ्यासारखं ग्रहण करत होते. प्रश्न हे शांततेने सुटतात , अडचणीच्या काळात शांत चित्ताने स्वतःवर विश्वास ठेवला तर तो काळसुध्दा सहज निघून जातो हे तू मला शिकवलंस. सबंध जग गाढ झोपेत असल्यामुळे आपल्या दोघांमध्ये कोणी येण्याचा प्रश्नच नव्हता. तुझा प्रभाव ह्यामुळे इतक्या मोठ्या अथांग समुद्राला भरती ओहोटी येते ती काही उगीच नाही. किती तरी कवी सहजच तुला जमिनीवर बोलावतात, गोडवी गातात. तू आहेच तसा, सगळं करूनही नामानिराळा राहणारा.

इतका सुंदर संवाद सुरू असताना वेळ कसा निघून गेला आणि तुझी जाण्याची वेळ कधी आली हे ना तुला उमगलं ना मला. पक्ष्यांच्या  मधुर किलबिलाटाने , चांदण्यांनी तुला घातलेल्या मधुर सादेने आपल्या दोघांनाही भानावर आणले.

खरं तर तुला स्वतःपासून लांब करण्याची माझी अजिबात इच्छा नव्हती. तुझ्यासोबत जगत असलेल्या या आपल्या, फक्त आपल्या दोघांच्याच विश्वाला ना मला सोडून जायची इच्छा होती ना तुला जाऊ देण्याची. पण तुझं जाण गरजेचं होतं आणि मला माझ्या वास्तविक जगात परतणे सुध्दा. तू गेलास खरा पण मला कायम स्वरूपी स्मरणात राहील अशी आठवण देऊन गेलास.

**- मृण्मयी सारंग**

# चांदोबा काल आणि आज

हे काव्य ग. दि. माडगूळकर यांच्या चांदोबा चांदोबा भागलास का या काव्याचे विडंबन आहे. हल्लीच्या मुलांनी निंबोणीचं झाड, मामाचा चिरेबंदी वाडा किंबहुना कुठल्या ही प्रकारचा वाडा हे सर्व पाहिलं असण्याची शक्यता जरा कमीच आहे, हल्लीच्या मुलांचं भावविश्व सुध्दा वेगळं असतं... त्यामुळे ते चांदोबाशी कश्या प्रकारचा संवाद साधतील याची ही छोटीशी झलक...

चांदोबा चांदोबा भागलास का?
सीमेंटच्या बिल्डिंग मागे लपलास का?
सीमेंट च जंगल दहा मजली...
निंबोणी ची झाडं आता नाही उरली....
आई बाबांवर रुसलास का?
खोली मध्ये जाऊन बसलास का?
भेटायला मला तू येशील का?
पिझ्झा बर्गर खाशील का?
आई ऑफिसात बसली असेल...
बाबाची मीटिंग चालु असेल...
एकटा तू bore होशील का?
भेटायला मला तू येशील का?
Updates तुझे मला रोज दिसतात...
Trending मध्ये आता चांदोमामा असतात....
आपलं पण reel post करायचं का?
Selfie तरी काढायला येशील का?
चांदोबा चांदोबा ऐकतोस ना?
वेबसीरीज बघत नाही बसलास ना?
फोनकॉल  माझा उचलशील ना?
आता तरी भेटायला येशील ना?

**-प्राजक्ता बर्वे**

# चंद्र आहे साक्षीला

पूर्वा आणि अभिराम , रत्नागिरीत राहणारं एक नवविवाहित दाम्पत्य. दोघेही एकमेकांना अगदी पूरक! अभिराम देखणा , रुबाबदार..तर पूर्वा नाजूक, अगदी चाफेकळी! या दोघांचा प्रेम विवाह अवघ्या रत्नागिरीत गाजला..! अभिराम पूर्वासाठी सुंदर कविता लिहायचा. पूर्वा आधी त्याच्या शब्दांच्या प्रेमात पडली आणि नंतर त्याच्या...! दोघांचंही एकमेकांवर भारीच प्रेम...

पूर्वाला तासंतास चंद्राकडे बघत बसायला आवडत असे. तिचं आणि चंद्राचं एक वेगळच नातं होतं. रोज रात्री समुद्र किनारी फिरायला जाण्याचा या दोघांनी जणू चंगच बांधला होता ! त्यातही कोजागिरी पौर्णिमा या दोघांच्या विशेष आवडीची..प्रत्येक कोजागिरी पौर्णिमेला ही दोघं समुद्र किनारी फिरायला जात आणि संपूर्ण रात्र तिथेच घालवत . गप्पा , गाणी आणि कवितांचा तिथे फड रंगत असे !

त्या दिवशी सुद्धा ती दोघं समुद्र किनारी फिरायला गेली होती.

"अभी. आज चंद्र जरा जास्तच सुंदर दिसतोय ना!" पूर्वा अभिराम कडे बघत म्हणाली..

"हो. ना ! अगदी तुझ्या सारखाच सुंदर , गहिरा आणि अथांग दिसतोय...." अभिराम पूर्वाचा हात हातात घेत म्हणाला.

"इश्श. तुझं ना काही तरी वेगळच असतं... मी काय बोलतेय आणि तुझं काय चाललंय..." पूर्वा लाजत म्हणाली.

अभिराम उगाच तिची खोड काढल्या सारखा हसत होता...

ती निरव शांतता , गडद अंधार आणि लाटांच्या खळखळण्याचा आवाज त्यांच्या गप्पांना एक वेगळाच रंग चढवत होता...चंद्राच्या शीतल प्रकाशात शतपावली करत असणारे पूर्वा आणि अभिराम एकमेकांत अधिकच विलीन होत होते...!

"अभी, किती दिवसात तू माझ्यावर कविताच केली नाही. ऐकव ना काही तरी.."

"काय लिहू पूर्वा तुझ्यासाठी? स्वतःच्याच श्वासाला कुठली आलीय उपमा? आता तर तुझ्या साठी माझे शब्द सुद्धा अपुरे पडतात... जसजसा तुझा सहवास मला लाभतो आहे ना , तशी तू अधिकच उलगडते आहेस...रोज तुझं नवं रूप बघतो मी. तू जेवढी हळवी , तेवढीच वेळप्रसंगी खंबीर आहेस . तुझी शिस्त , तुझं भावनाप्रधान असणं , छोट्या - छोट्या गोष्टींमध्ये आनंदी राहणं ....किती - किती छान आहे हे! "

अभिरामचं हे असं व्यक्त होणं पूर्वा खूप दिवसांनी बघत होती. आपल्या बद्दल कोणाला तरी इतकं छान बोलताना बघून तिला अश्रू अनावर झाले...

“अभी...इतकं प्रेम करतोस माझ्यावर? मी नं खरंच खूप भाग्यवान आहे , कारण तुझ्या सारखा जोडीदार मला मिळाला !”

अभिराम ने स्मित करत पूर्वाचे अश्रू पुसले.

दोघंही चालता - चालता एका मोठ्या दगडा जवळ आले.

“ बसायचं का इथे? “ अभिराम ने पूर्वाला विचारलं.

“हो बसुया ना. अभी...तुला दर वेळी हाच दगड कसा रे सापडतो? इतकं लक्षात राहतं तुझ्या!? ”

“हो मग; अगं जिथे - जिथे आपण एकत्र काही क्षण घालवले आहेत नं , ती प्रत्येक जागा माझ्या लक्षात आहे..!”

“ बापरे.. कमाल आहे तुझी...!”

असं बोलता-बोलता दोघेही त्या मोठ्या दगडाला पाठ टेकवून बसले. समुद्र न्याहाळत असताना अचानक पूर्वा ने एक अवचित प्रश्न अभिरामला विचारला ,

“ अभी, जर पुढल्या कोजागिरीला मी नसले तर तू इथे येशील?”

“ तू नसलीस तर म्हणजे? तू कुठे जाणार आहेस?”

“अरे नसले म्हणजे... समज जर मला काही झालं आणि मी तुला कायमची सोडून गेले तर...?”

“ हे काय आता नवीनच? तू हे असं काही बोलणार असशील तर मी नाही थांबणार इथे. ही काय कायमचं सोडून जाण्याची भाषा करतेय तू? मला अजिबात आवडलं नाही हे..आणि तूच नसशील तर माझ्या जगण्याचा तरी काय उपयोग? जिच्या मुळे ही तेजस्वी , ओजस्वी अशी कोजागिरी माझ्या आयुष्यात आली ; उद्या याच प्रकाशाचं कारण उरलं नाही तर माझं काय होईल...?” अभिराम पर्वावर नाराज होत म्हणाला...

“ अरे हो हो ..किती टेन्शन घेतोय तू? मी कुठे - कुठे जायची नाही तुला सोडून...”

“ तू लाख जाशील गं...मी हाऊ द्यायला हवं ना तुला...”

दोघेही गप्पांमध्ये रंगून गेले आणि मध्यरात्र कधी झाली हे ही त्यांना कळले नाही...

गप्पा मारता-मारता दोघांचाही डोळा लागला आणि दोघेही तिथेच झोपी गेले....

दुसऱ्या दिवशी सकाळी पूर्वाची झोप उघडली. बाजूला अभिराम नव्हता पण याचं तिला आश्चर्य किंवा नवल , काहीच वाटलं नाही. कारण हे प्रत्येक कोजागिरीला घडत असे...लग्नाला तीन वर्षे झाली आणि अभिरामचं अपघाती निधन झालं! पूर्वाला प्रचंड मोठा धक्का बसला. त्या धक्क्यातून तिला सावरायला खूप वेळ लागला...

अभिराम गेल्या नंतरच्या पहिल्या कोजागिरीला उदास मनाने पूर्वा समुद्र किनारी आली आणि तिथेच तिला पुन्हा एकदा अभिराम भेटला...त्या नंतर प्रत्येक कोजागिरी पौर्णिमेच्या रात्री पूर्वा समुद्र किनारी जात असे आणि न चुकता तिला तिथे अभिराम भेटत असे....प्रेमाचं हे असंच असतं! अशक्य असलेली बाब सुद्धा शक्य करण्याची ताकद ही फक्त प्रेमात आहे....! त्यांच्या या रहस्यमयी भेटीबद्दल कोणालाही एक अवाक्षर सुद्धा माहित नव्हते. पण या भेटीचा मात्र एक साक्षीदार होता ; आहे...आणि तो म्हणजे , कोजागिरी पौर्णिमेचा तो चंद्र....!

**- भार्गवी बाबरेकर**

# दोन तारे

मन ही देवाची किती सुंदर निर्मिती आहे. आपलं मन हे किती चंचल असतं ना आणि या मनाला जर चंद्राची साथ मिळाली तर अमृताहूनी गोड काय?

समुद्राच्या भरती ओहोटी प्रमाणे चंद्राची छटा जशी सतत बदलत जाते तसेच मनाचेही आहे. पौर्णिमेचा चंद्र जसा आकाशाला आपल्या लख्ख प्रकाशानी वेधून घेतो, जणू काही त्याने चांदण्यांना आपल्या मिठीतच घेतले आहे असे भासते. तर अमावस्येचा चंद्र हा सगळया चांदण्यांवर रूसून कुठे तरी दूर निघून गेला आहे असे वाटते. तसेच आपल्या मनाचेही आहे.

**मायेच्या हळव्या स्पर्शांने खुलते**

**नात्यांच्या बंधात धुंद मोहरते**

**मन उधाण वाऱ्याचे, गूज पावसाचे**

**का होते बेभान कसे गहिवरते**

**मन उधान वाऱ्याचे**

शंकर माहादेवन यांनी गायलेले हे अप्रतिम असे गीत आहे. या गीतात तर पूर्णपणे मनाचा उलगडा सुंदररित्या केलेला आहे आपले मन स्वप्नांमध्ये कसे हरवून जाते. संध्याकाळच्या त्या कातरवेळी आपले मन हे किती अस्वस्थ होते तर कधी वाऱ्याच्या प्रवाहासोबत मन धूंद होऊन डोलायला लागते. पावसाळयात बरसणाऱ्या सरी जश्या अलगतपणे खाली येतात तसेच मनातील विचार, कल्पना देखील अलगतपणे आपल्या ओठांवर येतात. मातीचा तो सुगंध जसा आपल्याला रोमांचित करतो तसेच मनातील सुंदर विचारही आपल्याला भावून बनवतात.

**पान जागे फूल जागे, भाव नयनी जागला**

**चंद्र आहे साक्षीला, चंद्र आहे साक्षीला**

जगदीश खेबूडकर यांचे अप्रतीम असे हे गीत आहे. यात त्यांनी चंद्राच्या वेगवेगळया छटांचा उल्लेख केलेला आहे. प्रियकर- प्रेयसीच्या मनातील भाव व त्यांच्या प्रेमाची साक्ष देणारा हा चंद्र आहे.

बरं का, पण हा चंद्र आपल्या सोबत वेगवेगळी नाती घेऊन आलेला आहे. लहान मुलांसाठी तो त्याचा मामा असतो. बहिणींसाठी तो भाऊ बनतो तर प्रियकरांसाठी प्रेमाचा साक्षीदार.

**निबोंणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई**

**आज माझ्या पाडसाला झोप का गं येत नाही**

हे गीत तर आपल्या सगळयांच्याच परिचयाचे आहे. अगदी लहानपणापासून आपण हे गीत ऐकत आलेलो आहे. आई आणि तिचे लेकरू या दोघांमध्ये असलेले आंतरीक मनातील प्रेम, वात्सल्य, जिव्हाळा हे

निःशब्द करणारे आहे. त्यांचे नाते काही वेगळेच आहे. आणि त्यांच्या सोबतीला आहेच की चंदामामा.

**बाई, बाई मन मोराचा कसा पिसारा फुलला**

जगदीश खेबुडकर यांची रचना असलेली हे गीत आहे. यात त्यांनी स्त्रीच्या मनातील अवस्थेचे सुंदररित्या असे वर्णन केले आहे. यात त्यांनी मन आणि प्रियकर यांचे अतुट असलेले नाते दर्शविले आहे.

खरचं किती सुंदर कल्पना आहे न. मन आणि चंद्र. किती साम्य आहे दोघांमध्ये. विविध कवींच्या, लेखकांच्या लेखणीतूनही याचा उल्लेख झालेला दिसतो.

असे हे आपले मन आहे सुंदर, शितल, नाजूक कधी रागवणार, तर कधी प्रेमाचे वर्षाव करणारे, खुलणारे, फुलणारे प्रत्येक क्षणाचा आभास करून देणार. काय चूक, काय बरोबर याची सांगड घालणार. कधी आईच्या कुशीत शिरणारे तर कधी प्रियकराच्या मिठीत अलगदपणे असणारे. वाऱ्यावर डोलणाऱ्या फुलासारखे तर कधी नदी बरोबर वाहत जाणाऱ्या प्रवाहासारखे असते ते फक्त मन, मन आणि मनच.

**- दिशा सचिन टिकेकर**

# मातृरूपेण संस्थिता

...... आता तर तिचाही नवाच जन्म होणार होता आणि तिच्यातला एक कोमल जीव जन्म घेणार होता...
ती अनभिज्ञ होती त्या जीवाबद्दल...
एक गोंडस जीव 'तो' असेल की 'ती' ??

गर्भधारणेपासून तर अगदी प्रसववेदनेपर्यंतचा काळ तिनं तिच्या डोळ्यात साठवून ठेवला होता.
चिमुकल्या स्पर्शाच्या ओढीनं ती तर पार वेडीपीशीच झाली होती.
हे इतकं सोप्पं असतं का??
आई होणं म्हणजे??

प्रत्येकच आईला तिचं मुल हे विशेषच असतं...!!
कितीतरी प्रपंच यातना सोसलेल्या असल्या तरी ती संपूर्ण आयुष्य आपल्या बाळासाठी/अपत्यासाठी समर्पित करते.

बाळाला आकारताना, त्याला रेखाटताना वात्सल्यानं भरून येतं आईचं मन...
गर्भारपणात त्याला घडवणं म्हणजे ते आपलंच प्रतिबिंब!!

बाळ मोठं होत जातं... आयुष्याचे टप्पे अजूनच उलगडत जातात... त्यात बाळाचे आजार, त्याचं अपंगत्व आणि कधी कधी तर 'बौद्धिक वाढ खुंटली आहे' म्हणुन समाज त्या बाळाला नाकारत जातं...
पण आई जिद्दी असते, कायमस्वरूपी लढण्यासाठी सज्ज असते...!

रांगत जाणारं बाळ कधी स्वतःच्या पायावर चालायला लागतं, हे लक्षात येण्यापूर्वीच दिवस भुर्रकन उडून गेलेले असतात.

संसाराचा गाडा कायम चालत रहावा यासाठी 'आई' आपल्या बाळाला सोडून हल्ली कामावर जाते... कष्ट करते...
दिवस बाहेर घालवला तरी ऑफिस संपताना हुरहुर लागते ती त्या घराची जिथं तिचं बाळ तिची वाट बघत असतं. आईला देखील वाटत असतं की कधी एकदा आपल्या छातीशी कवटाळून त्याला जवळ घेते...

रात्री ती आणि तिचं बाळ चंद्रावर पोचलेलं असतं... चिमुकल्याला मांडीवर घेऊन 'निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई' हे अंगाई गीत सुरू होतं... हे अंगाई गीत गाऊन बाळाला झोपवणारया अनेक आई आपण बघतोच.

आईच्या मुखातून बाहेर पडणारे अंगाई गीताचे स्वर ऐकताच, बाळ कधी झोपेच्या अधीन होतं, हे त्या चिमुकल्याला सुद्धा कळत नाही.
निंबोणीच्या झाडामागचा 'चंद्र' आणि बाळ यांचं नातं कायम गोडंच असणार आहे.

स्त्रीशक्तीचा उत्सव म्हणजे नवरात्र आणि नवरात्र झालं की स्त्री ला जसं पूर्णत्व येतं तसंच
चंद्र सुद्धा पूर्णत्वाला पोचता गेलेला असतो.
मनुष्याला कलाकलाने येणारे अनुभव आणि कलाकलाने वाढणारा चंद्र यानं आयुष्याला पूर्ण प्राप्ती येते.
ही पूर्णत्वाची प्राप्ती म्हणजेच कोजागिरी पौर्णिमा !

आदिम काळापासून सर्जन, पोषणाची देवता म्हणुन स्त्रीतत्त्वाचं पूजन विविध देवतांच्या रुपात होत आलं आहे.
स्त्री देवतेची कुमारी, मातृका, शारदा, लक्ष्मी, काली ही सौम्य आणि उग्र अशी रुपं प्रचलित आहेत.
कितीही कठीण प्रसंग आला तरी देवी माय त्या आईला त्या प्रसंगातून सुखरूप बाहेर काढतेच याचा नुकताच प्रत्यय मला येऊन गेला.
यमाच्या दाढेतून माझ्या बाळाला सुखरूप काढलं, ते त्या आदिमायेनेच. माझ्या बाळाची आई मी आणि आपली जगज्जननी तीच ना!
मातृत्वाला डाग बसणार नाही याची पुरेपूर काळजी आपली आदिमाय घेत असते आणि हे सांगते की जिद्द असावी, ती चांगल्यासाठीच !

पाठीवर अनेक वार झेलले...
काळजाला छिद्र पडतील, असे घाव सोसले...
पण बाळा, तू लिंपून टाकलंस क्षणार्धात, तुझ्या येण्याच्या चाहुलीनं...
तुझ्या मोहक हसण्यानं, जगण्याचं बळ दिलंय मला...
बाळाच्या अशक्तपणाला लाख जगानं नाकारलं हो, पण आई कधी नाकारेल का तिच्या काळजाच्या तुकड्याला??
तिनं जीव ओतलाय त्याच्यात ओतप्रोत...
आईपेक्षा कोणी कितीही जीव लावला तिच्या लेकराला, पण तिचं प्रेम हे नऊ महिने नऊ दिवस जास्तच असतं आणि ह्याचा हिशोब कुठेच नसतो ना...!

आयुष्याच्या प्रत्येक लढ्यात आई म्हणुन ती जिंकलेलीच असते... ती फक्त हक्क सांगत नाही... फक्त तिच्या अस्तित्वाची जाण मात्र हवीच!

**- अपूर्वा भालेराव**

# तोच माझा सांगाती

लग्नानंतर अनिशा पहिल्यांदाच घरी आली होती..ती येणार म्हणून घरात आई-बाबा , आजी सगळे आनंदात होते.. इतके दिवसांनी नात घरी येणार म्हणून आजीनी खास तिच्या आवडीच्या श्रीखंड- पुरीचा बेत केला होता..अनिशा आली तसे सगळे तिच्याभोवती घोळका करून बसले, बराच वेळ गप्पा झाल्यावर अनिशा तिच्या खोलीत गेली.. किती दिवसांनी ती तिच्या खोलीत आली होती, आल्या आल्या ती खिडकीजवळ गेली, आणि कितीतरी वेळ खिडकीत बसून बाहेर बघत होती..बराच वेळ झाला तरी ती आली नाही म्हणून आजी खोलीत गेली तर ती नेहमीप्रमाणे तिच्या आवडत्या जागी बसलेली.

त्या खिडकीसमोर असलेलं पारीजातकाचं झाड आणि त्याच्या फांद्यांमधून दिसणारा शांत,सुंदर चंद्र हे दृश्य ती तासनतास न्याहाळत बसायची.. तिचं त्या चंद्राचं काय नातं होतं कुणास ठाऊक, खरंतर लहानपणी ऐकलेली चंदामामाची गाणी, गोष्टी मुलं कालांतराने विसरतात, लहानपणी रडत असताना शांत करण्यासाठी "तो बघ आकाशात किती लांब आहेना,तो तुला रडताना पाहून हसतोय" असं म्हणून आईने दाखवलेल्या चंदामामालाही आपण कधीचेच विसरलेलं असतो, पुढे आपण स्वत:तच इतके रमतो की त्याच्याशी असलेलं आपलं नातं,त्याचं महत्त्व, वयाच्या प्रत्येक टप्प्यावर भासणारी त्याची रूपं या सगळ्या गोष्टी आपल्या विचारांच्या परीघात कधीच नसतात..

पण अनिशाच्या बाबतीत असं कधीच घडलं नाही.

आजही ती तिच्या मनातलं त्याला सांगत होती,आज कितीतरी दिवसांनी पुन्हा एकदा तिचं त्याच्याकडं एकटक बघत नजरेनेच त्याच्याशी संवाद साधणं, मनातलं गूज त्याच्याजवळ सांगणं आजीला जणू अपेक्षित होतं म्हणूनच तिला खिडकीत बसलेली पाहून जराही चाहूल न लागू देता तिच्या मागे येऊन उभी राहिली..

मग काही वेळाने म्हणाली "अगं अनिशा सगळं काही एकाच दिवशी सांगून टाकणारेस की काय त्याला,तो बिचारा शांतपणे सगळं ऐकून घेतो म्हणून बरय गं बाई "

अनिशा म्हणाली "खरंच गं आजी,तो माझं सगळं म्हणणं ऐकून घेतो, आणि नुसतंच ऐकत नाही तर बरंच काही सांगतोही, जणू तोच माझा सांगाती"

"हो हो, सगळं माहितीये मला ते, पण आता काही खाणारेस की इथे बसूनच पोट भरणारंय" आजी म्हणाली.

अनिशा म्हणाली "अगं आजी आता पुढचे काही दिवस मला दुसरं काहीच काम नाहीये ,मी इथे फक्त आराम करायलाच आलीये"

"पण तुझ्या गप्पा संपल्या तर आराम होईल, नाहीतर कसलं काय" आजी म्हणाली.

आजीचं बोलणं मधेच थांबवत अनिशा म्हणाली

"ए आजी, लहानपणी मी काहीही हवं असलं तरी ते आधी चंदामामाला सांगायची ,मग ते एखादं खेळणं असू दे, किंवा कपडे, पुस्तकं अगदी काहीही असू दे, मला जे काही मागायचं असेल, सांगायचं असेल ते सगळं चंदामामाकरवी आई-बाबांना सांगायची ना,आणि माझा कुठला हट्ट आई-बाबांनी पुरवला नाही तरीही मी त्याच्यावरच रूसून बसायची,

अनिशा पुढे बोलत होती,

“ दर वर्षी उन्हाळ्यात मी त्याला माझ्याबरोबर तूही आज्जीच्या गावाला चल म्हणून आग्रह करायची

,आणि गावाला गेल्यावर आज्जीच्या  घराच्या गच्चीतून तो दिसला की जाम खूश व्हायची, खरंच बालपण किती निरागस असतं ना गं आजी"

आजी म्हणाली,

" हो गं मला सगळं आठवतंय, आणि एकदा तू गच्चीत जाऊन त्यांच्याशी भांडत असताना बाजूच्या केळकर काकांनी काढलेला तुझा गुलाबी फ्रॉकमधला फोटो अजूनही मी ठेवलाय बरं का..., केळकर काकांना तूझं ते त्याच्याशी बोबड्या बोलात चालंलेलं भांडण बघून फार मजा वाटायची .. खरंच अनिशा तू त्याच्याशी किती भांडायची म्हणून सांगू "

अनिशा म्हणाली

"अय्या, हो का गं आजी,तो गुलाबी फ्रॉक तूच तर मला एका आसनीला घेऊन दिलेलास तेही माझ्या पसंतीने, किती मज्जा यायची गं कोजागिरी पौर्णिमेलाही, त्यादिवशी त्याचं रूप अगदी बघण्यासारखं असतं.. "

"आणि आजी गं, तो प्रसंग तर मला अजूनही आठवतो,एक वर्षी राखीपौर्णिमेला तूझा भाऊ राखी बांधायला आल्यावर ,चंदामामालाही राखी बांधायला घरी बोलव म्हणून वेडा हट्ट धरून बसली होती मी" अनिशा सांगत होती.."

"हो गं बाई, मलाही चांगलंच आठवतंय, किती गोंधळ घातला होतास तू त्यावेळी", लहानपणी तुला फ्रेंडशीप डेला फ्रेंडशीप बॅंडही त्यालाच बांधायचा असायचा, आणि रक्षाबंधनाला राखीही त्यालाच, खरंच काय नव्हती करत तू त्याच्यासाठी, नशीबच म्हणावं की आता व्हॅलेंटाईन डेला गुलाबाचं फुल फक्त अमोघलाच देतेस ते"  आजीचं हे बोलणं ऐकून दोघीही हसल्या...

"काय गं तू पण ना, पण आजी तूलाही चांगलंच माहितीये की अमोघ माझ्या आयुष्यात आल्यावर देखील त्याचं माझ्या आयुष्यातलं स्थान कधीच बदललेलं नव्हतं आणि कधी बदलणारही नाही, इनफॅक्ट मध्यंतरीच्या काळात अमोघ अमेरिकेत गेल्यावर अमोघ माझ्या जवळ नसतानाही मला कधी एकटं वाटलं नाही याचं कारणंही एकमेव तोच आहे आजी, तो म्हणजे खरंच खूप भारी आहे, एकदा तो कळू लागला ना की आपोआपच त्याच्याशी नातं निर्माण होत जातं " अनिशा म्हणाली...

आजी म्हणाली

"अगं तो आहेच मुळी तसा, त्याच्याकडे बघताच सगळा ताण,दु:ख विसरून तना-मनात प्रसन्नता संचारते, तसं पाहिलं तर चंद्राचा स्वत:चा प्रकाश नाहीच तो ,तो सूर्यानी त्याला दिलाय, तरीही चेहऱ्यावर कुठलाही भाव नाही उलट प्रसन्नताच जाणवते..स्वत:मुळे इतरांना आनंद देणं, उदास मनाला प्रसन्न करणं, सकारात्मकता,ऊर्जा या त्याच्या गुणांना आपण आत्मसात करू शकलो, ना तर आपणही इतरांना त्याच्यापमाणेच भासू लागू.."

अनिशा म्हणाली,

"खरंच गं आजी, म्हणूनच तर तो मला इतका भावलाय ,त्याचं माझ्या मनातलं स्थान मी कधी सांगूच शकणार आणि माझं त्याच्याशी असलेलं नातं मी स्वत:ही कधी ओळखू शकणार नाही, फक्त इतकंच म्हणेन तोच माझा सांगाती..

**- तृष्णा आंबेकर**

# चंद्रावलोकन...!

नुकतीच दिवेलागणी झालेली,देवघरात मंद तेवणारा नंदादीप,उदबत्तीचा सुगंध,तुळशीजवळ लावलेला दिवा आणि त्या दिव्याच्या प्रकाशात उजळलेली तुळस तसंच काहीसं तुझ्या प्रकाशात न्हाऊन निघणारो आम्ही! शरदाचं चांदणं आणि तू म्हणजे कधीही न बद्दलणारं समीकरण. ऋतू कुठलाही असला तरी तुझं अस्तित्व हे मनाला मोहून टाकतं हे मात्र त्रिकालाबाधित सत्य..!तू शाश्वत आहेस, सत्य आहेस. मनाचा कारक म्हणून तुझी ख्याती आजतागायत आम्ही ऐकतोय आणि अनुभवतोय. शरद ऋतूची चाहूल लागली की मनाला कोजागिरी पौर्णिमेचे वेध लागतात. आणि त्यात तुझं संपूर्ण चंद्रबिंब म्हणजे आनंदाची पर्वणी...! तुझ्या रूपाचं वेड कोणाकोणाला लावत नाहीस तू? म्हणजे बघ ना, तुझ्या ठायी सगळी शास्त्र आहेत. कलेकलेने वाढणारा असल्याने कला, दिसायला मोहक असल्याने सौंदर्यशास्त्र, तुझं अस्तित्व अवकाशात कुठे आहे? किती दूर? हे सगळे ठोकताळे असल्याने विज्ञानमय तू आहेसच. आणि कलेकलेने वाढण्यात एक प्रमाण आहे गणित आहे म्हणून तुझ्यात वाणिज्य सुद्धा आहे. थोडक्यात काय तर तू सर्वशास्त्र प्रमाण आहेस.

ज्योतिष शास्त्रापासून ते भाषा संगीत शास्त्रापर्यंत तुझी व्याप्ती आहे. आणि तरीही तू त्यतिष्ठदशांगुलम् या न्यायाला अपवाद मात्र नक्कीच  नाही. म्हणजे बघ ना, कविमनाचा ठाव घेणारा तू, प्रियकर प्रेयसीच्या प्रेमाचा दुवा तू, अभिसारीकांना वाट दाखवणारा तू, इतकंच नाही तर चंद्रविकासी कमळं सुद्धा तुझ्या प्रकाशातच फुलतात. तू आणि तुझ्या चांदण्या म्हणजे त्या आकाशात काढलेल्या कशिदाच. कोजागिरी ला म्हणा किंवा कोणत्याही पौर्णिमेला म्हणा तुझं रूप जरा जास्तच खुलून दिसतं. डोळ्याला शीतलता आणि आनंद देणारं तुझं गोरं गोरं शरीर! तू आमचं बालपण समृध्द केलंस पण तुझं बालपण कोणी समृद्ध केलं असेल रे? हा प्रश्न मनाला कायम पडतो.

समुद्रमंथनातून निघालेल्या १४ रत्नांपैकी एक म्हणजे तू. तुझा मोह भगवान शंकर यांना सुद्धा अपवाद ठरला नाही इतकंच काय तर साक्षात विष्णुस्वरूप असलेल्या प्रभू श्रीरामचंद्र यांनी तर तुला त्यांच्या नावातच धारण केलं. तसा तुझा आणि आमचा संबंध अगदी जन्मापासूनचा म्हणता येईल. म्हणजे बघ ना जन्माच्या वेळी ज्या राशीत तू भ्रमण करत असशील ती आमची रास. म्हणजे तुझं अस्तित्व आमची ओळख निर्माण करायला किती महत्वाचं असतं नाही? मला कायम एक प्रश्न पडतो खरतरं मोहच म्हण... की प्रभू रामचंद्रांचा जन्म चैत्र मासात माध्यान्ह काळी झाली तेव्हा सूर्य त्यांच्या जन्माचा साक्षीदार होता. आणि श्रीकृष्णाचा जन्म रात्री झाला.. तेव्हा तू असशील ना? चांद्रवंशीय तुझ्यामुळेच त्याला म्हणत असतील ना? यमुनेला आलेला पूर त्यात रात्रीची वेळ खूप पाऊस अशा वेळी तूच त्या वसुदेवला मार्ग दाखवला असंशील ना? ते दृश्य म्हणजे ज्योतीने तेजाची आरती असंच असेल ना?

आमच्या मनातल्या सगळया गुजगोष्टी तुला ठाऊक असतात म्हणूनच तुला मनाचा कारक म्हणत असतील. लहानपणी अभ्यासलेली सूर्यमाला तुझ्याशी खेळायला येत असेल ना? तशी चंद्रमाला का नाही? हा सुद्धा एक कुतूहलाचा मुद्दा आहे माझ्यासाठी. तू आमच्या मनाचा कारक पण तुझं मन कोण जपतं? तू कलंकित तुझ्यावर डाग आहेत गणेश चतुर्थीला तुझ्याकडे पाहिलं की चोरीचा आळ येतो, रात्र भयाण वाटते असे किती किती आरोप ऐकावे लागतात ना तुला? तरीही तू शांतच..!इतकी स्थितप्रज्ञता तुझ्यात आली तरी कुठून रे? रोज सूर्योदय झाल्यावर तू कुठेही निघून जात नाहीस तिथेच असतोस.. हेच सांगायला का? की, दुसऱ्याच्या तेजात तुम्ही अंधुक जरूर दिसता पण तुमचं अस्तित्व हे तुमच्या उपस्थितीवर अवलंबून असतं?

चतुर्थी, भाऊबीज,ईद,पौर्णिमा हे सगळं फक्त तुझ्या असण्यामुळेच रे. तुझं रूप बघायला तुला समुद्रासारखा आरसा आहे. तुझ्या केवळ असण्याने आणि नसण्याने समुद्रात भरती ओहोटी येते. मामा म्हणून तुझी ओळख झाली तरी तू सखा म्हणून जवळचा वाटतोस. आमच्या लहानपणी चांदोबा नावाच्या मासिकाने आमचं लहानपण घडवलं म्हणजे ते तूच घडवलं असंच म्हणायला हवं ना?

तू प्रेमगीतात आहेस, विरहात आहेस, इतकंच काय तर भक्तीरसाचा परिपोष तुझ्यात आहे.. प्रेयसीच्या मनातले भाव प्रियकरापर्यन्त पोहोचवायला कवी सुद्धा चांदण्यांच्या कोषाचा आधार घेतात.आणि त्याच भक्तिरसात असलेला एखादा अभंग तुझ्या कैवल्यरूपी चांदण्याला चकोर होऊन भुकेला असतो..!

**- सायली अक्षय देशपांडे**

# या नभीच्या चांदण्यांनो

सहा ऋतूंचे सहा सोहळे साजरे करणारी वसुंधरा विविध रूपांनी नटली असली तरी प्रत्येक ऋतूत तिच्यात होणारे दर्शन विलोभनीय असते. आणि प्रत्येक ऋतूचा मिळणारा संदेश सुद्धा वेगळा असतो. ग्रीष्माची दाहकता शमविण्यासाठी चराचर सृष्टी मेघदूतांच्या आगमनाची वाट पाहत असते. आणि अवचितपणे झोकाळलेल्या नभातून बरसणाऱ्या जलधारा अलगदपणे खाली झेपावतात. वसुंधरेवर होणाऱ्या या जलाभिषेकाने आसमंतात मृद्गंध दरवळू लागतो. प्राणीमात्रांमध्ये नवचैतन्य निर्माण करतो.

हिरवा शालू परिधान करून नटलेली वसुंधरा मनातील भटकंतीला साद घालू लागते. वसुंधरेचे हे नवीन रूप बघत बघत ऋतुमान बदलते आणि शरद ऋतूची चाहूल लागते. स्वच्छ निळया आकाशात चांदण्यांच्या दाट चादरीचे दर्शन घडू लागते. हळूहळू कलेकलेने वाढणारा चंद्र मनाला भुरळ घालू लागतो. अनेक क्षणांचा साक्षी असलेल्या चंद्राला उपमा देणे म्हणजे मनाला वेड लागल्यासारखे होते. सहजच शतपावली करत असतांना आकाशात डावीकडे लक्ष गेले तर निरभ्र आकाशात चांदीच्या थाळीएवढा शुभ चंद्र हसत हसत वर आला होता. आकाश स्वच्छ असल्याने सप्तर्षी, व्याधाची चांदणी, ध्रुवतारा, तेजस्वी गुरु यांचे नुसत्या डोळ्यांनी सुद्धा दर्शन घडत होते. आकाशात सुंदर चांदण्या चमकत होत्या. जणू असे वाटले की, विश्वसुंदरीच्या मुलायम, झिरझिरीत निळ्या साडीला जरदोसी जरीकाम केले आहे की काय? आणि तिच्या या साडीच्या पदरावर चांदण्या जडविल्या आहेत की काय असा भास होत होता. या आकाशातल्या साडीच्या कल्पनेचे अप्रूप वाटून मनात साडीविषयी कुतूहल दाटून आले.

कलेकलेने वाढणाऱ्या चंद्राचे रूप बघून माझे मन साडीभोवती गिरक्या घेऊ लागले. मनाचे अनेक पदर उलगडून मी कितीतरी वेळ उभी राहून विचारात गुंतले. मनात अनेक विचारांचे काहूर उठले. खरंच साडी ही फक्त साडी नसून स्त्रीमनातील अनेक नाते उलगडणारे वस्त्र आहे! तिच्या भावविश्वाचे महत्वाचे अंग आहे. भातुकलीचा खेळ खेळताना आईची चिमुरडी आईची साडी नेसते. त्यावेळपासून ही आईची साडी तिच्या भावविश्वाशी लपेटली जाते ती कायमची. " वहिनिला आणायला चांदोबाची गाडी चांदोबाच्या गाडीला हरिणाची जोडी" यात असलेलं तिचं भावविश्व खरोखरच विलोभनीय असच असतं. वयात येणाऱ्या मनाला हळूहळू चंद्राचे वेड लागते. तारुण्यातील अनेक गुजगोष्टी या चंद्राजवळ व्यक्त केल्या जातात. दोन जीवांनी एकेमेकांसाठी घेतलेल्या आणाभाकांचा साक्षीदार तोच असतो. त्यांच्या जीवाची तळमळ तो दुरून बघत असतो. त्याच्या आठवणीत तिच्या चेहऱ्यावरील हसू तोच टिपत असतो. हे गुपित थोरामोठ्यांपर्यंत न पोहोचवता आधी आईजवळ सांगतांना ती मनाच्या कलाने आणि त्याला साक्षी ठेवलेल्या भावाने आईला सांगते, " शालू हिरवा पाचूनी मढवा वेणी तिपेढी घाला साजणी बाई येणार साजण माझा"

रात्र अधिकच दाट झाली की त्यावर खुलून दिसणारा चंद्र आणि त्याच्या भोवती असलेल्या शततारका म्हणजे जणू गोकुळात सुरु असलेला रासच. तो चंद्र म्हणजे कृष्ण आणि त्या तारका म्हणजे त्याच्याभोवती असलेल्या गोपिका. असे अनेक पदर उकलत हा चंद्र मनातल्या नाजूक आणि हळव्या कोपऱ्याला हात घालतो. साडी आणि त्याच्यात असलेलं साम्य म्हणजे त्यांच्यात असलेलं अनेक भावनिक आणि मनाच्या जवळचे पदर. त्याला साक्षी ठेऊन घेतलेल्या वचनात तितकीच भावनिक गुंतवणूक असते.

जीवनातील  अनेक भावरूपी छटांचे दर्शन घडविणारा, आपल्या मनाला समजून घेणारा आपण सांगितलेले गुपित जपणारा, चंचल मनाला स्थिर करणारा जीवनाचा सखा म्हणजे चंद्रमा....! हाच चंद्र बालपणापासून आपल्या सोबत असतो ते वयाची ८१ वर्ष पूर्ण होतपर्यंत अगदी वयाचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा होत असतांना सुद्धा तो आपली साथ सोडत नाही तो आपला जवळचा सखा असतो...!

- कल्याणी देशपांडे

# समारोप

रसिकहो, तिचं पानच्या आठव्या मासिकांकाचं प्रकाशन आज झालं. हा कोजागिरी विशेषांक आपल्या पसंतीस उतरला असेल. जून महिन्याच्या अंकापासून पुढील सगळ्या अंकांमध्ये आपण वेगवेगळ्या लेखिकांना यात सामावून घेणे सुरु आहे. प्रत्येक स्त्री मध्ये कुठेतरी एक लेखिका असते. लेखिका नसली तरी एखादी गोष्ट रंगवून सांगण्याची तिच्यात कला असते. ती उत्तम निवेदिका असते. तिच्यात हे सगळे गुण असतात फक्त ते कधी कधी सुप्त राहून जातात त्या गुणांना या माध्यमातून जागृत करण्याचा हा प्रयत्न.

आपलं प्रेम असंच असू द्या.पुन्हा भेटूया पुढील महिन्यात नवीन विषय आणि मासिकांकासह...!

आणि हो, तुमच्या पैकी कुणाला या उपक्रमात सहभागी व्हायचे असेल तर तुम्ही नक्की सहभागी व्हा. आम्ही आपल्या प्रतिक्षेत आहोत. या वाक्यावर क्लिक करून आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता. संपूर्ण नियमावली ही या फॉर्म वर उपलब्ध आहे.

**आमचे आधीचे प्रकाशित अंक (अंक वाचण्यासाठी खालील नावावर क्लिक/टॅप करा):**

मार्च २०२१

एप्रिल २०२१

मे २०२१

जुन २०२१


जुलै २०२१

ऑगस्ट २०२१

सप्टेंबर २०२१

आपल्याला जर अंक आवडला असेल तर कृपया आपले अमूल्य मत आम्हाला नक्की कळवा, खाली अभिप्रायासाठी लिंक देत आहोत..

**अभिप्राय**


AKSHAY DESHPANDE
PHOTOGRAPHY
टीप: चांदण्याचा अनुभव घेण्यासाठी आपल्या फोनचा brightness वाढवा